# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र

# जिल्हा नागपूर (ग्रामीण), नागपूर

# दिनांक 02/12/2020 (बुधवार)

.................................................................................................................

## चोरी

१) पोलीस ठाणे बुटीबोरी :— अंतर्गत दिनांक २३/११/२०२० चे २०.३० वा. ते २०.४५ वा. दरम्यान फिर्यादी भुषण वसंतराव बडनेकर, रा. शिक्षक कॉलनी, बुटीबोरी यांनी त्यांची होंडा सीबी शाईन मोटार सायकल क्र. एमएच ४०/बी डब्लु ९३१६ किंमत २५,०००/— रु. ची मंगलम ट्रेडर्स समोर उभी करुन किराणा सामान घेण्यास गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेली. सदर प्रकरणी पोलीस ठाणे बुटीबोरी येथे फिर्यादी यांचे तक्रारीवरुन कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार श्री मिलिंद नांदुरकर हे करीत असुन अज्ञात आरोपीचा शोध सुरु आहे.

२) पोलीस ठाणे कळमेश्वर :— अंतर्गत दिनांक २९/११/२०२० चे १७.३० वा. दरम्यान फिर्यादी अनिल शिवाजी लाखे, वय ३४ वर्षे, रा. घोराड यांनी त्यांची हिरो होन्डा मो. सायकल क्र. एमएच ४०/ आर ७१८९ किंमत २०,०००/— रु. ची कळमेश्वर आठवडी बाजरातील अग्नीशमन केंद्रासमोर ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेली. सदर प्रकरणी फिर्यादी यांचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे कळमेश्वर येथे कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. गुन्ह्याचा तपास सहा. पोलीस उपनिरीक्षक श्री नरेश नारनवरे हे करीत असुन अज्ञात आरोपीचा शोध सुरु आहे.

३) पोलीस ठाणे काटोल :— अंतर्गत दिनांक ३०/११/२०२० चे २१.०० वा. ते २३.३० वा. दरम्यान फिर्यादी अजिंक्य अन्नाजी डेहनकर, रा. पंचवटी, काटोल हे माहेश्वरी मंगल कार्यालय, काटोल येथे कार्यक्रमाकरीता गेले असता मंगल कार्यालयाचे बाहेर ठेवलेली त्यांची बजाज पल्सर मोटार सायकल क्र. एमएच ४०/एएस ६९२९ किंमत ३०,०००/— ची कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेली. सदर प्रकरणी पोलीस ठाणे काटोल येथे फिर्यादी यांचे तक्रारीवरुन कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार श्री अरुण भेंडे हे करीत असुन अज्ञात आरोपीचा शोध सुरु आहे.

## रेती चोरी

पोलीस ठाणे अरोली :— अंतर्गत दिनांक ०१/१२/२०२० चे ०७.१५ वा. ते १०.३० वा. दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेचे पथक गस्तीवर असता मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारे सुर नदीच्या पात्रात जावुन पाहणी केली असता क्र. १) प्रशांत चुडामन झुंझाड, वय ३५ वर्षे, रा. मुरमाडी, २) राजेंद्र मनोहर रामटेके, वय २८ वर्षे, रा. पिंपळगाव, ३) असलम रशिद झाडीये, वय २७ वर्षे, रा. पिंपळगाव हे क्र.

४) आनंदराव चिंधुजी बांते, वय ४८ वर्षे, रा. पिंपळगाव यांचे सांगण्यावरुन सुर नदीचे पात्रातून ट्रॅक्टर क्र. एमएच ४०/ बीजे ७४५२ व ट्रॉली क्र. एमएच ४०/ एएम २००९ मध्ये विना परवाना अवैध्यरित्या ०१ ब्रॉस रेती चोरी करून वाहतूक करतांनी मिळून आले. सदर प्रकरणी त्यांचेकडुन एकुण ६,१६,०००/— रु. चा मुद्देमाल जप्त करुन त्यांचेविरुद्ध पोलीस उपनिरीक्षक श्री सचिन मत्ते, स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे अरोली येथे कलम ३७९, १०९ भादंवि सहकलम १३०/१७७ मोवाका अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. पुढील तपास पोलीस नाईक श्री राजेंद्र पुडके हे करीत आहेत.

## फसवणुक

पोलीस ठाणे उमरेड :— अंतर्गत दिनांक २४/११/२०२० चे १४.०० वा. ते २६/११/२०२० चे ११.०० वा. दरम्यान फिर्यादी अंकुश वसंता वाघमारे, वय २५ वर्षे, रा. बुधवारी पेठ, उमरेड यांना चारचाकी वाहन खरेदी करावयाचे असल्याने ओएलएक्स वर पाहणी करीत असता त्यांना स्वीफ्ट डिझायर व्हिडीआय कार क्र. एमएच १२/केई ३२४० ही पसंत आली. त्यांनी सदर कारच्या जाहिरातीवर दिलेल्या मोबाईल क्रमांकावर फोन करुन कारच्या किंमतीबाबत विचारणा केली. यावर १,५०,०००/— रु. कारची किंमत ठरवुन फिर्यादी यांनी त्यांना सांगण्यात आल्याप्रमाणे फोन पे आणि गुगल पे च्या माध्यमातुन जाहिरातीवर नमुद मोबाईल क्रमांकाच्या धारकास वेळोवेळी १,१२,०५०/— रु. पाठविले. परंतु वाहन देण्याबाबत टाळाटाळ होत असुन वाहन मिळत नसल्याने आपली फसवणुक झाल्याचे फिर्यादी यांचे निदर्शनास आले. सदर प्रकरणी फिर्यादी यांचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे उमरेड येथे कारच्या जाहिरातीवर नमुद मोबाईल क्रमांकाच्या धारकाविरुद्ध कलम ४२० भादंवि सहकलम ६६ (ड) माहिती तंत्रज्ञान अधिनियमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला. गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक श्री विलास काळे हे करीत असुन आरोपीचा शोध सुरु आहे.

## अल्पवयीन मुलीस फुस लावुन पळवुन नेले

पोलीस ठाणे सावनेर :— अंतर्गत दिनांक ३०/११/२०२० चे ०९.३० वा. ते २२.३० वा. दरम्यान फिर्यादी महिला ही नातेवाईकांकडे गेली असता फिर्यादी हिचे राहते घरुन तिच्या अल्पवयीन मुलीच्या अज्ञानपनाचा फायदा घेवुन कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावुन पळवुन नेले. सदर प्रकरणी फिर्यादी महिलेच्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे सावनेर येथे कलम ३६३ भादंवि अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक श्री पाटील हे करीत असुन आरोपी व अल्पवयीन मुलीचा शोध सुरु आहे.

## अपघातात मृत्यु

पोलीस ठाणे अरोली :— अंतर्गत दिनांक ०१/१२/२०२० चे ०९.०० वा. दरम्यान मौजा कोदामेंढी फाटा येथे ओमनी कार क्र एमएच ३१/ डीके ०४८९ चा चालक दिनेश कन्हैया बिसेन, वय ३८ वर्षे, रा. नांदगाव याने आपले वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन लच्छीराम सिताराम थोटे, वय ८० वर्षे, रा. नांदगाव यांना धडक मारुन गंभीर जखमी केले. त्यांना प्राथमिक आरोग्य केंद्र कोदामेंढी येथे

दाखल केले असता उपचारादरम्यान मरण पावले. सदर प्रकरणी पोलीस ठाणे अरोली येथे फिर्यादी सदानंद लच्छीराम थोटे, वय ४४ वर्षे, रा. नांदगाव यांचे तक्रारीवरुन कलम २७९, ३३८, ३०४ (अ) भादंवि सहकलम १८४ मोवाका अन्वये चालक दिनेश कन्हैया बिसेन, रा. नांदगाव याचेविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला. गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक श्री ऋषिकेश चाबुकस्वार हे करीत आहेत.

पोलीस माहिती कक्ष
जिल्हा नागपूर (ग्रामीण), नागपूर.